## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५३१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०७/२०१७

**१) घरात प्रवेश करुन महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २४/०७/२०१७ चे ००.३० वा. दर. यातील फिर्यादी ही तिच्या मुलीसह घरी छपरी मध्ये झोपली असता यातील आरोपी याने फिर्यादीचे घरी अनाधीकृत प्रवेश करून फिर्यादीचे उजवे पायाला पकडले असता ति ओरडयाल्याने आरोपीने तिचा हात पकडला असता फिर्यादीचा पती हा झोपेतुन उठल्याने आरोपी पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३५४(अ),४५२, भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे लाखांदुर हे करीत आहेत.

**२) एटीएमधुन पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २४/०७/२०१७ चे १२.१५ ते १२.३० वा. दर. यातील फिर्यादी मुकेश राजेन्द्र वाहणे वय ३० वर्ष, रा. शिवाजी वार्ड साकोली हा युनीयन बॅक शाखा एटीएम मध्ये पैसे काढण्यास गेला असता यातील अनोळखी आरोपी इसमांनी तुझे एटीएम बरोबर नाही असे बोलुन फिर्यादीचे पासवर्ड पाहुण ठकबाजी करुन फिर्यादीचे खात्यामधील १२,०००/—रु. एटीएम मधुन काढुन फिर्यादीची फसवणुक करुन पैसे घेवुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४२०,३४ भादंवि. सहकलम ६६(सी) आय टी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गायकवाड पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) डोक्यावर काठीने मारुन व लाथा बुक्यांने मारहान करुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २३/०७/२०१७ चे २१.३० ते २२.०० वा. दर. यातील जखमी फिर्यादी हेमराज केवलराम केझलकर वय ४५ वर्ष, रा. किरमटी व त्याचा भाऊ मोरेश्वर केवळराम केझलकर वय ३५ वर्ष, हा खर्रा खाण्या करीता गावातील चौकामधील पानठेल्यावर गेले असता आरोपी हे मोटार सायकल घेवुन त्या ठिकाणी येवुन जखमीचे भावाचे अंगावर गाडी आणली व त्याने हटकले असता भांडण केले फिर्यादी जखमी हा मधात जावुन तुम्ही माझे भावास का मारहान करता असे बोलले असता आरोपी क्र. १ याने जखमीच्या डोक्यावर काठीने मारुन जखमी केले व आरोपी क्र. २ याने लाथा बुक्यांने मारहान करुन जखमी केल्याने फिर्यादी जखमीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. पुसाटे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) सिमेंटची विट डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २३/०७/२०१२ चे २०.०० वा. दर. यातील आरोपी व त्याचे आईचे भांडण सुरु असता फिर्यादीने त्यास हटकले असता आरोपीने पडलेली सिमेंटची विट उचलुन फेकुन फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी अशोक मन्साराम शेन्द्रे वय ५० वर्ष, रा. खुंटसावरी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. मलेवार पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**५) अवैध दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक २४/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, तुमसर व पवनी येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून १८ लिटर हा.भ. दारू किंमती ११५०/—रु. तसेच ६ लिटर १२० मिली लिटर देशी दारू किंमती १७६८/—रु. असा एकुण किंमती २९१८/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.